जुलै २००४

# थकबाकी वसुलीसाठी राज्याच्या सहकार आयुक्तांची अनास्था

महाराष्ट्र राज्यातील १४ हजार नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांमध्ये झालेली थकबाकी वसुल करणे कामी वॉर्ड, तालुका, जिल्हा विभागीय व राज्य स्तरावर त्या विभागाचे सहकारी संस्थांचे नोंदणी अधिकारी यांची प्रत्यक्ष थेट मदत होणे आवश्यक असते. व त्यासाठीच महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये सहकार खाते हा एक स्वतंत्र विभाग तयार केलेला आहे. सहकार खात्याचा कारभार मंत्रालयातील सहकार सचिव ते राज्याचे सहकार आयुक्तांपासून वॉर्ड / तालुका स्तरावरील सह / उपनिबंधक स्तरावर कार्यान्वीत आहे.

पतसंस्थांच्या कार्यक्षेत्रावर व संस्थेच्या खेळते भांडवल व ठेवीच्या मापदंडाने राज्यातील काही पतसंस्थांना त्यांच्या स्तरावर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५६ नुसार वसुलीचे अधिकार प्रदान केलेले आहेत. म्हणजेच विशेष वसुली व विक्री अधिकारी म्हणून (SRO) अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. राज्यातील जिल्हा बँका, नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी बँकांचे असोसिएशन / फेडरेशन, नागरी/ ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था व त्याचे राज्य / विभागीय जिल्हा / तालुका - वॉर्ड स्तरीय फेडरेशनला अपवादात्मक परिस्थितीमध्ये (SRO) चे अधिकार राज्याच्या सहकार आयुक्तांनी प्रदान केलेले आहेत. आणि हे **अधिकार देण्याची कुठलीही नियमावली, पात्रता निकष राज्याच्या सहकार आयुक्तांनी तयार केलेले नाहीत.** SRO देण्याच्या पध्दतीला कुठलीच नियमावली नसल्यामुळे प्रस्थापितांनाच व अपवादात्मक परिस्थितीमध्ये पतसंस्थांना थेट SRO चे अधिकार मिळालेले आहेत. राज्यातील अनेक पतसंस्थांनी / फेडरेशनने SRO मिळणेसाठी त्या स्तरावर मागणी केलेली अनेक प्रकरणे कुठल्याही कारणाशिवाय प्रलंबित आहेत. त्या संदर्भात सहकार आयुक्त कुठल्याही पत्रव्यवहार किंवा SRO न देण्याच्या कारणांची उत्तरे संबंधितांना पाठवित नसल्याची माहिती आमच्याकडे प्राप्त झालेली आहे. आणि ही बाब राज्याच्या सहकार चळवळीस घातक आहे.

ताजे उदाहरण द्यावयाचे झाले तर त्या मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने मुंबई शहरातील प्रामुख्याने १८०० नागरी सहकारी सभासद पतसंस्थांच्या थकबाकी वसुलीसाठी सहकार खात्याकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये थकबाकी वसुलीसाठी दावे स्विकारणे, सुनावणी घेणे व त्यांचा निवाडा करणे व अंतिमरित्या थकबाकी वसुली दाखला देण्यासाठी सहाय्यक निबंधक दर्जाचे एक अधिकारी बँकेच्या खर्चाने गेले ३ ते ४ वर्षापासून उपलब्ध करून घेतलेले आहेत. संबंधित न्यायालयीन कामकाज वेळेवर व्हावे, त्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, यासाठी आवश्यक फर्निचर, स्टेशनरी व स्टाफसहित मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बांद्रा रिक्लेमेशन शाखेतील प्रशस्त जागा उपलब्ध करून दिलेली आहे. हेतु एवढाच की, मुंबई शहरातील संस्थांची थकबाकी वसुल करण्यासाठी शहरातील विविध २० को-ऑप. वॉर्डामध्ये कलम १०१ खाली दावे दाखल केल्यानंतर होणारा विलंब, कुठलेही वेळापत्रक नाही व इतर अनेक न सांगता येणाऱ्या बाबी टळाव्यात व संस्था चालविणाऱ्या कार्यकर्त्यांना व सभासदांना देखील अत्यंत सुलभ व सहज पध्दतीने पारदर्शकरित्या न्याय मिळावा य ासाठी हे दालन खोललेले आहे. आणि त्या माध्यमातून हजारो निवाडे अनेक संस्थांना तीन ते सहा

महिन्याच्या कालावधीमध्ये प्राप्त झालेले आहेत. आणि संबंधित अधिकारी ह्यांच्याकडून या संदर्भातील कामाचा आढावा नियमितपणे मुंबै बँक घेत असते. व त्यांच्या काही अडचणी असल्यास ताबडतोब त्यावर मार्ग काढला जातो. परंतु दिनांक २/०४/२००४ पासून २/०७/२००४ पर्यंत बांद्रा रिक्लेमेशन येथील या कार्यालयात राज्याच्या सहकार आयुक्तांनी अगोदरील अधिकारी श्री. मुदंडा यांची बदली केल्यामुळे, नविन अधिकारी उपलब्ध करून दिलेच नाहीत. मुंबै बँकेने व फेडरेशन म्हणून बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचा अध्यक्ष म्हणून मी या संदर्भात ४ ते ५ वेळा पाठपुरावा केला. परंतु २ जुन २००४ पर्यंत मा. सहकार आयुक्तांनी कोणालाच दाद दिली नाही. **किंबहुना तीन महिने कुठल्याही संस्थेची चालू असलेल्या सुनावण्या होऊ शकल्या नाही, नवीन प्रकरणे संस्थांना दाखल करता आल्या नाहीत.** तसेच ही सुविधा आता बंद होणार की काय असा संभ्रम शहरात झाल्यामुळे थकबाकीचे प्रमाण वाढण्यास सहकार आयुक्तांची ही भूमिका कारणीभूत ठरली आहे. वास्तविक श्री. मुदंडा यांची बदली केल्यानंतर दुसऱ्या दिवशी स्वत:हून राज्याच्या सहकार आयुक्तांनी त्यांचे जागेवर नविन अधिकारी द्यावयास हवे होते. परंतु ते अत्यंत महत्त्वाचे काम त्यांनी केले नाही. व पाठपुरावा करूनही ३ महिने तसे काम करण्याची त्यांची इच्छा दिसली नाही. महाराष्ट्र राज्यातील संस्थांची की जे सहकार आयुक्त आय.ए.एस. अधिकारी आहेत, असे सहकार आयुक्त उमेशचंद्र सारंगी, यांची अनास्था महाराष्ट्र राज्याला महाग पडत चाललेली आहे.

अनेक पतसंस्थांना / फेडरेशनला SRO देण्याची मा. सहकार आयुक्तांची मानसिकता नाही. किंबहुना महाराष्ट्र राज्यातील सहकार चळवळ सुदृढ व्हावी त्यासाठी आपली वैधानिक जबाबदारी पुर्ण करावी, वेळेत काम करावे, असे मा. सहकार आयुक्त श्री. उमेशचंद्र सारंगी यांना वाटत नाही. ही बाब राज्य सरकारच्या दृष्टीने सुध्दा लोकहिताची नाही. असे अधिकारी ज्यावेळी थकबाकी सारख्या महत्त्वाच्या विषयावर आपली उदासिनता दाखवितात, त्यावेळेस निश्चितपणे महाराष्ट्रातील सहकार चळवळीस अडचणीत आणण्याचे काम एक विशिष्ट यंत्रणा करते की काय, अशी पुन्हा – पुन्हा जाणीव होते. वास्तविक SRO कोणाला द्यायचा व तसा प्रस्ताव आल्यानंतर किती दिवसात द्यायचा ह्याची नियमावली राज्याचे सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्याच्या हितासाठी, स्वत:हून का करत नाही ? याचा विचार प्रथम राज्य सरकारने करण्याची आवश्यकता आहे. कोणाच्या लहरी खातर राज्यातील सहकारी चळवळ, पतसंस्थांची ही सर्वसामान्यांची चळवळ अन्यायाच्या गर्द छायेत ठेवता येणार नाही. त्याचे परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर हळूहळू प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे होऊ शकतात हे सरकारने अशा सहकार आयुक्तांना वेळीच बजावून सांगण्याची गरज आहे. अन्यथा अनावश्यक वेळी कलम १४ चा वापर करणाऱ्या सहकार आयुक्तांना आपल्या जबाबदारीच्या कक्षा सांभाळण्याची गरज आहे. आणि त्यावर शासनाने आता तरी गेले ३ ते ४ वर्षात या राज्यात ज्या पध्दतीने सहकार आयुक्तांनी सहकार चळवळीकडे बघितले गेले, त्याचा आढावा घेण्याची गरज आहे.

आमचे तर या संदर्भात असे म्हणणे आहे की, राज्याच्या पुणे येथील मुख्य कार्यालयातील गेली ३ ते ४ वर्षाच्या कारभाराची राज्य सरकारने हायकोर्टाच्या निवृत्त किमान ३ न्यायाधिशांमार्फत चौकशी करणे आवश्यक आहे. आपल्या हे निश्चितपणे लक्षात येईल की, वेगवेगळ्या प्रकारच्या संस्थांची नोंदणी प्रत्येक वेळी कशा पध्दतीने

केली, उपविधी दुरूस्तीस मंजुरी प्रत्येक वेळी कशा पध्दतीने केली, सहकार कायदा पायदळी तुडवून वेगवेगळ्या सहकारी संस्थांचे उपविधी कसे बनवून दिले, **पतसंस्थांची कार्यक्षेत्र वाढविण्यासंदर्भात खोटे ताळेबंद पत्रके अहवाल** दप्तरी जमा करून कार्यक्षेत्र व शाखा विस्तारास कशा परवानग्या दिल्या, लेखापरिक्षणामध्ये सापडलेल्या गंभीर त्रुटींच्या अन्वये काहींना सजा तर काहींना कशी प्रशस्तीपत्रके बहाल करण्यात आली, निधी गुंतवणुकीच्या संदर्भात व कर्जवाटपाच्या संदर्भात अत्यंत अविचाराने महाराष्ट्र राज्यातील सर्वसामान्य जनतेचा पैसा कसा धोक्यात आणला, ह्या महत्त्वाच्या व अन्य अनेक गोष्टी, राज्याच्या जनतेसमोर उघड होतील आणि त्याचवेळी गेले ३ ते ४ वर्षे राज्यातील माझ्यासहित अनेक कार्यकर्ते व सहकारी संस्था जे बोलत आहेत त्याची खात्री होईल. म्हणून राज्य सरकारने या मुख्य कार्यालयाची वर लिहिल्याप्रमाणे त्वरीत माहिती घ्यावी व राज्यातील सहकार चळवळीला ताकद देण्यासाठी सतर्क व्हावे व या चळवळीस जी शक्ती बाधा पोहचविण्याचे काम पध्दतशीरपणे करीत आहे, त्यांचेवर कारवाई करावी.

राज्याच्या सहकार आयुक्तांची थकबाकी व वसुलीसाठीची अनास्था आपल्या महाराष्ट्र राज्याला जास्त काळ दुर्लक्षून चालणार नाही. उद्रेक टाळण्यासाठी, राज्य सरकारने त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**